दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 261, Marathi Daily Sunday, Date - 12 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २६१ वा | मराठी दैनिक | रविवार दि. १२ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# मराठवाडा विद्यापीठात पेपरफुटला

## बीकॉम परीक्षेचा पेपर 'डायरेक्ट टॅक्स' प्रश्नपत्रिका व्हॉट्सअ‍ॅपवर विक्रीस; परीक्षेपूर्वीच पेपर लीक

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी परीक्षेदरम्यान वाणिज्य शाखेच्या 'डायरेक्ट टॅक्स' विषयाच्या प्रश्नपत्रिकेची गळती झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. दुपारी २ वाजता होणारा ८० गुणांचा पेपर काही तास आधीच व्हॉट्सअ‍ॅपवर पीडीएफ स्वरूपात विक्रीसाठी उपलब्ध झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या प्रकाराची चाहूल संबंधित महाविद्यालयाचे संचालक डॉ. सतीश सुराणा यांना दोन-तीन दिवसांपूर्वीच लागली होती. परीक्षा केंद्राबाहेर विद्यार्थ्यांच्या संशयास्पद हालचाली दिसत असल्याने त्यांनी ११ एप्रिल रोजी परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी एका विद्यार्थ्याच्या मोबाईलमध्ये दुपारच्या पेपरची पीडीएफ फाईल आढळून आली. अधिक तपासणी केली असता, व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पेपर विक्रीचा प्रकार सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

सकाळी १० वाजल्यापासून पेपर उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत संबंधित व्यक्तीकडून १४० रुपये ऑनलाइन पाठवण्यास सांगण्यात आले होते. यासाठी क्यूआर कोडद्वारे पेमेंट घेण्यात आले. पैसे भरल्यानंतर दुपारी १.१० वाजताच्या सुमारास विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिकेची पीडीएफ मिळाल्याचे उघड झाले.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून डॉ. सुराणा यांनी तात्काळ विद्यापीठाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधत संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर विद्यापीठाचे पथक तातडीने परीक्षा केंद्रावर दाखल झाले आणि घटनेची चौकशी सुरू करण्यात आली. या घटनेमुळे विद्यापीठ प्रशासनातही मोठी धावपळ उडाली आहे.

मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ करिअर एज्युकेशन अँड रिसर्च या संस्थेच्या माध्यमातून हा प्रकार समोर आल्याने



परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून परीक्षेच्या पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, परीक्षा नियंत्रकांनी तातडीने हालचाली करत पेपर गळतीमागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नेमली आहेत. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून आणि कोणत्या माध्यमातून बाहेर पडली, याचा सखोल तपास सुरू असून दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### कडक नियोजनाची गरज; विद्यापीठाने खांदेपालट करणे अत्यावश्यक

मराठवाडा विद्यापीठातील पेपरफुटीच्या प्रकाराने परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या आहेत. प्रश्नपत्रिका सुरक्षिततेपासून ते वितरण प्रक्रियेपर्यंत अनेक पातळ्यांवर निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येते. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत होतो आणि गुणवत्ताधारित शिक्षण व्यवस्थेला मोठा धक्का बसतो.

विद्यापीठ प्रशासनाने आता केवळ चौकशीपुरते मर्यादित न राहता संपूर्ण परीक्षा प्रणालीचा सखोल आढावा घेणे गरजेचे आहे. प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई, वाहतूक आणि वितरण या सर्व टप्प्यांमध्ये अत्याधुनिक सुरक्षा उपाययोजना लागू करणे आवश्यक आहे. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

या पार्श्वभूमीवर परीक्षा विभागात तातडीने खांदेपालट करून सक्षम व प्रामाणिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे गरजेचे ठरत आहे. डिजिटल यंत्रणांचा वापर, सीसीटीव्ही देखरेख, आणि पेपर वितरणाची पारदर्शक पद्धत राबवली तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसू शकतो.

विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी विद्यापीठाने ठोस पावले उचलणे ही काळाची गरज आहे.

## थोडक्यात...

### नाशिकमधील आयटी कंपनीचे युनिट बंद, कर्मचाऱ्यांचे स्थलांतर

**नाशिक । प्रतिनिधी**

लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणानंतर नाशिकमधील नामांकित कंपनीला टाळं लागणार आहे. कंपनीमधील कर्मचाऱ्यांना आता मुंबई, पुण्यातील इतर प्रोजेक्टमध्ये शिफ्ट केलं जाणार असल्याची माहिती आहे. नाशिकमधील धर्मांतर प्रकरण उघडकीस आल्यानंतर कर्मचाऱ्यांना नाशिक युनिटमध्ये जाण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना एकतर मुंबई-पुण्याला स्थलांतरित व्हावं लागणार आहे किंवा नवीन नोकरी शोधावी लागणार आहे.

नाशिकमधील एका कंपनीमधील लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणानंतर देशभर खळबळ उडाल्याचं चित्र आहे. त्यामुळे या कंपनीने आता नाशिकमधील त्यांचं युनिटच बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कंपनीतील कर्मचाऱ्यांवर एकतर मुबंई-पुण्यात स्थलांतरित होण्याची किंवा बेरोजगारी टाळण्यासाठी नविन नोकरी शोधण्याची वेळ आली आहे.

सध्या या कंपनीमध्ये पोलीस तपासाच्या कारणास्तव मोजकेच कर्मचारी येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेचा तपास करण्यासाठी नाशिक पोलिसांनी एसआयटी स्थापन केली आहे. कागदपत्रची तपासणी तसेच इतर माध्यमातून पोलिसाची चौकशी सुरू आहे. कंपनीच्या आवारात काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

नाशिकमधील नामांकित आयटी कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचं लैंगिक शोषण आणि धर्मांतरण प्रकरणाचा तपास केंद्रीय यंत्रणांकडून होण्याची शक्यता आहे. एनआयए, एटीएस आणि सीबीआय या प्रकरणाचा तपास करण्याची शक्यता आहे. डखढ कडून प्रकरणाची महत्वाची माहिती तिन्ही तपास यंत्रणांना कळवण्यात आली आहे. लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणात मोठं रॅकेट असल्याचा संशय आहे.

लैंगिक शोषण प्रकरणातील तौसिफ अत्तार, रजा मेमन, शाहरूख कुरेशी, शफी शेख, आसीफ शेख हे आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तरुणीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणारी कंपनीतील महिला अधिकारी अश्विनी चेनानी पोलीस कोठडीत आहे. तर आरोपींच्या गुन्ह्यात सहभागी असणारी निदा खान अद्यापही फरार आहे. पोलीस तिचा शोध घेण्यात अजून तरी अपयशी ठरलेत. नाशिकच्या एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत उघडकीस आलेले लैंगिक शोषण आणि धर्मांतराचे प्रकरण आता अधिक गडद होत चालले आहे. केवळ लैंगिक शोषणच नाही, तर तरुणींचे पद्धतशीरपणे ब्रेनवॉश करून त्यांचे धर्मांतर करण्याचा मोठा 'मास्टरगेम' कंपनीत सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे. तपासादरम्यान पीडित तरुणीच्या बाबतीत काही अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. पीडितेने सलग दोन वर्षे महिना-महिनाभर उपवास पकडण्यास सुरुवात केली होती. हिंदू मैत्रिणींनी तिला जेवणासाठी बोलावले तरी ती स्पष्ट नकार देत असे. धक्कादायक म्हणजे, पीडितेने गेल्या वर्षापासून 'लिप्स्टिक' लावणेही पूर्णपणे बंद केले होते. पिडीता त्यात अडकून गेली होती अशी माहितीही समोर आली आहे.

# हायवा ट्रकची जोरदार धडक; विरारमध्ये महिला शिक्षिका ठार

**विरार । प्रतिनिधी**

मुंबईच्या विरारमध्ये अपघाताची एक दुर्दैवी घटना घडली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील शिरसाड नाका येथे शनिवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात शाळेत जाणाऱ्या एका शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्वीडल गोम्स (वय ४०, रा. निर्मळ) या तिल्हेर येथील मस्कर पाडा जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्या शनिवारी सकाळी शाळेकडे जात असताना शिरसाड नाका येथे बसस्टॉपकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या हायवा



ट्रकने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली.

दरम्यान, हि धडक इतकी भीषण होती कि, या धडकेत ट्रकचा टायर अंगावरून गेल्याने स्वीडल गोम्स यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित हायवा ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच मांडवी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन रुग्णवाहिकेद्वारे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून ट्रक चालकाचा शोध घेत आहे. मात्र या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या अपघाताची बातमी कळताच परिसरात तसेच तिल्हेर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व पालक वर्गात शोककळा पसरली आहे. दरम्यान, महामार्गावर हायवा ट्रकद्वारे क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि चालकांचे प्रशिक्षण याबाबत प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# पुणे पोलीस दलात खळबळ; 'रील स्टार' महिला पोलिसांसह तिघे निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर पोलीस दलात मोठी खळबळ उडवणाऱ्या प्रकरणात 'रील स्टार' म्हणून ओळखली जाणारी महिला पोलीस कर्मचारी सोनाली हिंगे हिच्यासह तिघा पोलिसांचे निलंबन करण्यात आले आहे. नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना ब्लॅकमेल करून तब्बल सात लाखांची खंडणी उकळल्याचा गंभीर आरोप या तिघांवर आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अजित बडे (सध्या सायबर पोलीस ठाणे), पोलीस शिपाई सुदाम तायडेआणि दामिनी पथकातील सोनाली हिंगे या तिघांचा समावेश आहे.



कर्तव्यातील हलगर्जीपणा आणि बेजबाबदार वर्तन केल्याप्रकरणी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत हे निलंबन कायम राहणार आहे.

या प्रकरणाचा उलगडा अत्यंत धक्कादायक पद्धतीने झाला. एका महाविद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीची काही कागदपत्रे अडकल्याने तिने पोलिसांची मदत घेतली. मात्र, या तिघा पोलिसांनी याचाच गैरफायदा घेत विद्यार्थिनीला सोबत घेऊन प्राचार्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली. पुढे त्यांनी विद्यार्थिनीमार्फत प्राचार्य आणि महाविद्यालयाविरोधात छळाची तक्रार देण्यास भाग पाडले.

तक्रारीची भीती दाखवत या तिघांनी प्राचार्यांना धमकावले. 'प्रकरण गंभीर आहे, अनेक तक्रारी आहेत.

# अशोक खरात प्रकरणात मोठी घडामोड; १६० जीबी डिजिटल पुरावे हाती

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या तपासात दररोज काही धक्कादायक बाबी समोर येत आहेत. अशातच आता अशोक खरात विरोधात पुरावे संकलित करण्याच्या कामाने वेग घेतला आहे. अशोक खरातच्या तपासात तब्बल १६० ऋइ डिजिटल पुरावे तपास यंत्रणांनी गोळा केल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे भोंदु खरातच्या मिरगाव येथील ईशान्येश्वर मंदिरातील पुजाऱ्याची पुन्हा एकदा डखढ कडून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. अशोक खरात पूजाविधी सांगून भक्तांना काही खडे, रत्न आणि बनावट अंगठी देऊन फसवणूक करत होता. अशोक खरातच्या संबंधित असलेल्या एका सराफ व्यावसायिकाची देखील एसआयटीने चौकशी केल्याची



माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मिरगाव येथील ईशान्येश्वर मंदिरातील पूजाविधी करून भक्तांची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी डखढ कडून तपास सुरू आहे. मिरगाव येथील ईशान्येश्वर मंदिरातील पुजारी आणि सराफ व्यवसायिकाची खरात समक्ष चौकशी करून घेतले असून डखढ ने जाब विचारत जबाब नोंदवला आहे. पूजा विधीच्या नावाने आणि इतर देवतांची आराधना करत सुरू असलेले आर्थिक व्यवहार कशाच्या आधारे सुरू होता.

# अंबेजोगाईतील शाळेत धर्मप्रसाराचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या अंबेजोगाईतील नामांकित शिक्षण संस्थेच्या एका शाळेमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार होत असल्याचा आरोप करण्यात आलाय. यामुळे जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय परिसरात असलेल्या संस्थेच्या एका शाळेतून ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला जात असल्याची माहिती सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांना समजले असता, त्यांनी थेट शाळा गाठत याबाबत चौकशी केली. यानंतर शाळेत जात त्यांनी माहिती घेतली असता शाळेत एस.आय. एन.चर्च नाव असलेल्या कपाटात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारी पुस्तके, जादूटोण्याच्या वस्तू, आणि नशेची औषध असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

दरम्यान, हा प्रकार शिक्षकांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने होत असल्याचा त्यांनी सांगितलं. शाळेचा सबंध नसलेली एक व्यक्ती दर रविवारी ख्रिश्चन धर्माची प्रार्थना घेत असून गेल्या १५ वर्षापासून हा प्रकार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान याबाबत आज सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी शिक्षण संस्थेच्या कार्यालयात



जात संस्थाचालकांना याचा जाब विचारला. या प्रकरणात सहभागी असलेल्यांवर पुढील दोन दिवसात कारवाईची मागणी केली. तसेच संस्थेशी संबंध नसलेला व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात यावा, ही कारवाई न झाल्यास संस्थेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आलाय.

दरम्यान, या प्रकारबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय, गटशिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

कुठलीही शिक्षण संस्था, शाळा महाविद्यालय कुठलीही जागा धर्मप्रसाराचे कार्य करण्याची जागा नाही. हा स्थापनेपासूनचा विचार आहे, तो आम्ही आजही जपत आहोत. आम्ही या प्रकरणात ताबडतोब चौकशी करणार असल्याचे शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी सांगितलेय.




## संपादकीय...

### नैतिकतेलाही तडा...

छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी परीक्षेत उघडकीस आलेल्या पेपरफुटीच्या प्रकाराने संपूर्ण शिक्षण व्यवस्थेलाच हादरा दिला आहे. 'डायरेक्ट टॅक्स'सारख्या महत्त्वाच्या विषयाचा पेपर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच व्हॉट्सअ‍ॅपवर विक्रीसाठी उपलब्ध होणे, ही केवळ एक घटना नसून व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या त्रुटींचे स्पष्ट द्योतक आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रामाणिक परिश्रमांवर पाणी फेरले जाते आणि गुणवत्ताधारित शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येक विद्यार्थ्याला आपले भविष्य घडवण्यासाठी परीक्षा हीच एक प्रमुख कसोटी असते. मात्र अशा प्रकारच्या गैरप्रकारांमुळे मेहनती विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, तर गैरमार्गाने यश मिळवणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून सामाजिक नैतिकतेलाही तडा देणारी बाब आहे. या प्रकरणात विशेष लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे, पेपर केवळ काही तास आधीच नव्हे तर नियोजनबद्ध पद्धतीने पैशांच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आला. यावरून या प्रकारामागे एक संघटित साखळी कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई करून हा प्रश्न मिटणार नाही; तर या रॅकेटच्या मुळापर्यंत जाऊन कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. विद्यापीठ प्रशासनाने तातडीने चौकशी सुरू केली असली, तरी यापुढे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी काम भागणार नाही. परीक्षा व्यवस्थेचा संपूर्ण पुनर्विचार करून, प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई, साठवणूक आणि वितरण या सर्व प्रक्रियांमध्ये अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा लागू करणे गरजेचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कडक देखरेख आणि जबाबदाऱ्यांचे स्पष्ट निर्धारण यामुळेच अशा घटनांना आळा बसू शकतो. याचबरोबर, परीक्षा विभागात आवश्यक त्या ठिकाणी खांदेपालट करणे हीदेखील काळाची गरज ठरते. जबाबदारी न पेलणाऱ्या अधिकाऱ्यांऐवजी प्रामाणिक व दक्ष अधिकाऱ्यांची नियुक्ती करून व्यवस्थेत विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटना पुन्हा घडण्याची भीती कायम राहील. या घटनेतून एक गोष्ट स्पष्ट होते-पारदर्शकता आणि शिस्त यांचा अभाव असेल, तर कोणतीही व्यवस्था कोलमडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेची पत राखण्यासाठी विद्यापीठाने केवळ आश्वासने न देता ठोस आणि परिणामकारक पावले उचलली पाहिजेत. अन्यथा 'ज्ञानाची काशी' म्हणून ओळख असलेल्या संस्थेची प्रतिमा मलिन होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतीराव फुले



भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे.महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे.समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे.त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे.त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे मानव हा सर्वात मोठा धर्म आहे ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून साकारलेली होती.

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला...

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली
गती विना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले...

त्या काळातील समाज रुढी-परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी समाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.

सन १८७३ मध्ये त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद,अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सत्यशोधक समाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.तत्कालीन ब्राह्मण्यवादाला झुगारून नव्या चालीरीती समाजाला दिल्या.

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. त्यांच्या शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

महात्मा फुले हे केवळ कृतीशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. गुलामगिरी या ग्रंथातून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर सार्वजनिक सत्यधर्म मधून मानवतावादी धर्माची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते.याशिवाय त्यांनी गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड,ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न,सार्वजनिक सत्य धर्म,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून दिली. रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली.शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्वाचे व्यक्तिमत्त्व त्यांना मानले जाते.

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले.सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणांना स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून 'बोले तैसा चाले ,त्याची वंदावी पाऊले', असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहिर मागास वर्गीयांसाठी खुली केली. ब्राह्मण्यवादाचा आयुष्यभर विरोध करुनही त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला.त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये त्यामुळे महात्मा जोतीबा फुले वेगळे ठरले आहेत.

सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करुन स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले. महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली.त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राला फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय. महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

# मनाची तरलता जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने साहित्य निर्मिती आवश्यक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

साहित्य मानवी व्यक्तिमत्वाला यंत्रमानव होऊ देत नाही. मनाची तरलता साहित्य जिवंत ठेवते. त्यामुळे चक्रधर स्वामी, ज्ञानेश्वर माऊलीचा वारसा असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये महिलांनी साहित्य निर्मिती अखंड सुरू ठेवावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली यांच्या सहकार्याने सरहद संस्था, पुणे यांनी येथे महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते या याचे उद्घाटन झाले.

नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात हे संमेलन विविध दालनात होत असून मुख्य समारंभ स्थळाला छत्रपती महाराणी ताराराणी दालन नाव देण्यात आले आहे. ताराराणी यांच्या जयंतीचे हे ३५१ वे वर्ष आहे. मंचावर मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्ष ज्येष्ठ लेखिका माजी अतिरिक्त मुख्य सचिव लीना मेहंदळे, माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी, महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला, मुख्य संयोजक सरहदच्या सुषमा संजय नहार, सहसंयोजक लेशपाल जवळगे यांची उपस्थिती होती.

देशभरातील महिला अधिकारी साहित्यिकांपुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषेची समृद्धी विशद केली. भारतातल्या किंवा जगातल्या कोणत्याही भाषेमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनापेक्षा मराठीत होणारी संमेलने सर्वाधिक आहेत. झाडीपट्टी पासून ते विद्रोही साहित्य संमेलनापर्यंत हा साहित्यिकांचा मेळा सर्वाधिक मराठीत फुलतो.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराणी ताराबाई यांच्या पराक्रमाचा गौरव करताना त्यांच्या ३५१ व्या जयंती पर्वावर होत असलेल्या महिला साहित्य संमेलनाचे कौतुक केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर पुढची ६४ वर्ष ताराबाईनी स्वराज्याचे रक्षण करतांना मुघलांना सळो की पळो करून सोडले. स्वराज्याची संकल्पना करतानाच त्यांनी उत्तम प्रशासन राबवून महाराणी ताराराणी यांनी सर्व समाजाला एकत्र आणले. त

यांचा आदर्श प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ठेवायला हवा. फाईलींमध्ये हरवून जाणाऱ्या शासकीय महिला अधिकाऱ्यांच्या या साहित्य संमेलनांनानी भाव विश्वाला सांभाळण्याचे काम या साहित्य संमेलनातून झाले आहे. 'निर्णयार्थ सादर' अशा शासकीय शेऱ्यापेक्षा कविता आणि कादंबऱ्यामधून प्रगत होणारी ही भाषा संवेदनशील आणि तरल आहे. त्यामुळे खरोखर आनंद होत आहे.यावेळी त्यांनी महिलांच्या मल्टीटास्किंग कौशल्याचे कौतुक करताना महिला अधिकारी दिलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडतात असे सांगितले. आपल्या कार्यकाळात राज्याच्या मुख्य सचिवांपासून तर मुंबई महानगरपालिका आयुक्तांपर्यंत अनेक महत्त्वाच्या पदांवर महिलांची वर्णी लागल्याचेही त्यांनी सांगितले.



कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आव्हानाच्या काळामध्ये तंत्रज्ञानाच्या पुढे मानवाला वाटचाल करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढचे एखादे संमेलन यंत्रमानवांचे देखील घ्यावे लागू शकते. तथापि, तंत्रज्ञानापेक्षा माणूस कायम अग्रेसर राहणे आवश्यक आहे. साहित्य व्यक्तिमत्त्वाला यंत्रमानव होऊ देत नाही मनाची तरलता जीवंत ठेवण्यासाठी साहित्याची निर्मिती करत रहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

तत्पूर्वी, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले, राज्यातील सर्व मराठी भाषेतील पोर्टल अपडेट राहील. मराठी भाषा इंटरनेटवर अधिक प्रभावी होईल संस्कृत भाषेचे प्रमोशन करण्यात येईल.

याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी भाषेसाठी ७५ मंच तयार करणार आहोत .प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्याला पुरस्कार देण्यासाठी मराठी भाषा विभाग पुढाकार घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या सोबतच ग्रामीण भागाच्या साहित्यासाठी, बाल ,महिला यांच्याही साहित्याला पुरस्कार देण्यात येईल. वारकरी संमेलन आयोजित करण्यात येईल,अशी ही घोषणा त्यांनी केली.


संमेलनाध्यक्ष लीना मेहंदळे यांनी या संमेलनाचा संदर्भ देत महाराष्ट्राने सुरू केलेल्या या प्रयोगाचा कित्ता राज्यांनी ही गिरवावा. भारताच्या सगळ्या राज्यांमध्ये अधिकाऱ्यांच्या साहित्य कोणाला वाव द्यावा. पुरस्कार द्यावा. तसेच संगणक प्रणालीवर मराठी भाषेमध्ये साहित्य निर्मिती लिखाण अधिक सुलभ सहज करण्यासाठी प्रयत्न करावे,इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवावी आणि संस्कृतचे प्रमोशन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी मराठी साहित्यातील महिला साहित्यिकांचे योगदान लक्षात घेता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी महिला साहित्यिकांचा विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशासनात महिलांच्या सहभागामुळे प्रशासन आणखी लोकाभिमुख होत असल्याचे त्यांनी सांगितले सचिव तथा निवासी आयुक्त आर विमला महिला अधिकारी संमेलन आयोजनामागची भूमिका विषद केली. फाईलच्या गर्दीत कविता सांभाळणाऱ्या देशभरातील कानाकोपऱ्यातील महिला अधिकाऱ्यांनी यासाठी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी महिला जगताचे आभार व्यक्त केले. तसेच या पहिला प्रयोगाला मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आशीर्वादाबद्दल त्यांचे आभार मानले. महाराणी ताराबाई यांच्या ३५१ व्या जयंती वर्षा निमित्त या संमेलनाच्या आयोजन करण्यात आले आहे. या आयोजनातून तलवारीपेक्षा लेखणीचे महत्त्व किती अधिक आहे, हे महिला साहित्यिकांच्या या मेळातून सिद्ध झाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक साहित्य संमेलनाच्या आयोजन करणाऱ्या सरहद संस्थेचे प्रमुख संजय नहार यांनी केले. यावेळी भारतीय पोलीस सेवेतील वरिष्ठ अधिकारी निलांबरी जगदाळे भारतीय पोलीस सेवेतील निवृत्त अधिकारी अरुणा लिमये यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांच्या कार्यकर्तृत्वासाठी सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये आर. विमला यांच्या जिओ मेरे मन, लीना मेहंदळे यांच्या ऑल टाइम रिफ्लेक्शन ऑन चेंजिंग इंडिया, ड. निशा चव्हाण यांच्या लीगल ऑफ भिडे वाडा, मयूर मसुरकर यांच्या महाराणी ताराराणी, गीतांजली टेमगिरे यांच्या मधुमालती डॉक्टर मंगल पांचाळ धोटे यांच्या अंतरणात या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. निरजा आपटे यांनी सूत्रसंचालन केले. सहसंयोजक लेशपाल जवळगे यांनी आभार मानले.

## क्रांतीसुर्य-महात्मा फुले



क्रांतीसुर्य महात्मा फुले ह्यांचे सबंध समाजासाठी,
शिक्षणक्षेत्रात कार्य खूप थोर,
त्यांच्या कार्य शिवाय इतिहासाचे पान राहील नेहमी कोर..!
गुलामगिरी, शेतकऱ्यांचा असुड अशा ग्रंथातून मांडले व्यथा,
प्रश्न धारधार,
सत्य शोधक समाजाची स्थापना करून केला
वंचित समाजाचा उद्धार!
स्त्री शिक्षणासाठी चालू केली १८४८ वर्षी भिडेवाडा
इथे मुलींची पहिली शाळा
त्यातूनच पुढे स्त्रियांनी शिक्षण घेऊन, प्रगती करून
कमी केल्या जीवनातील कळा!
त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्यासाठी काही
समाज कंटकानी दिला त्रास,
पण नाही करू शकले त्यांच्या कार्याचा,
विचारांचा कधीच ऱ्हास..!
महात्मा फुले यांनी केले दीनबंधू वर्तमानपत्राचे संपादन,
योगदान त्यांचे मोठे होते बांधणीसाठी कात्रज बोगदा,
कालवा खडकवासला धरण
विधवा स्त्रियांचे केशवपनबंदीच्या संपासाठी निवडले
तळेगाव ढमढेरे हे गाव
कृषि क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान म्हणून दिले
राहुरी विद्यापीठाला त्यांचे नाव
अशा थोर क्रांतिसूर्यास समाजाला अंधकारातून प्रकाशाकडे
नेणाऱ्या समाजसुधारक महात्मा फुले यांना
जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**लेखन-B.S KENDRE (विद्यार्थी).**

## थोडक्यात

### मुंबई महानगर प्रदेशसह विविध जिल्ह्यांना वीज पुरवठा सक्षम

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचा (महापारेषण) महत्त्वाकांक्षी बाभळेश्वर-कुडूस ४०० के.व्ही. हा वीजवाहिनी प्रकल्प गुरूवारी (दि.९) पूर्ण होऊन वीजवाहिनी कार्यान्वित करण्यात आली. ऊर्जा विभागाच्या या प्रकल्पामुळे सुमारे ५ मेगावॅट वीज नुकसान कमी होणार असून मुंबई महानगर प्रदेशातील विद्युत दाबामध्ये योग्य ती सुधारणा होणार आहे. तसेच, या द्विपथ वाहिनीवरून सुमारे ३००० अतिरिक्त वीज वहन क्षमता उपलब्ध होणार असून मुंबई, ठाणे, पालघर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना मोठा फायदा होणार आहे. अशी माहिती महापारेषण कडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या वेगाने निर्णय प्रक्रियेत महापारेषणचे संचालक (प्रकल्प/संचलन) सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता महेंद्र वाळके, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता महेश भागवत व परिमंडळातील अधिकारी कर्मचारी यांनी कामगिरी पूर्ण केली. यंत्रणांच्या समन्वयामुळे अखेर मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्यात आले.

या प्रकल्पांतर्गत एकूण ७१५ मनोरे उभारण्यात आले असून द्विपथ वाहिनीची लांबी सुमारे २२८ कि.मी. आहे. यापैकी नाशिक विभागात ४८५ मनोरे उभारणी आणि ३०४ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम, तर वाशी विभागात २३० मनोरे उभारणी आणि १५२ सर्किट कि.मी. तारा ओढण्याचे काम पूर्ण झाले आहे.

या वीजवाहिनीमुळे सद्यस्थितीतील पडघे-बाभळेश्वर १ व २ या वीजवाहिनीवरील ताण कमी होणार असून प्रणालीची विश्वासार्हता वाढणार आहे. कुडूस उपकेंद्राला अतिरिक्त वीज स्रोत उपलब्ध होऊन मुंबई परिसरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता सुलभ होणार आहे. हा भव्य प्रकल्प २०१० मध्ये मंजूर करण्यात आला पण विविध अडचणींमुळे लांबला होता. स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, महसूल विभाग, पोलिस आणि वनविभाग यांच्या सहकार्य व मदतीमुळे या प्रकल्पाची अंमलबजावणी मेसर्स कल्पतरू प्रोजेक्टस इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात आल्याचे महापारेषणने म्हटले आहे.

### जळगावात जनक्रांती मोर्चा प्रदेशाध्यक्ष मुकुंद सपकाळे यांच्यावर जीवघेणा हल्ला

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव शहरातील गजबजलेल्या रिंग रोड परिसरात आज शनिवारी (दि.११) दुपारी जनक्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मुकुंद सपकाळे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. दुचाकीवरून आलेल्या टोळक्याने सपकाळे यांची कार अडवून चारही बाजूंनी जोरदार दगडफेक केली.

या भीषण हल्ल्यात सपकाळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून शहरात खळबळ उडाली आहे. मुकुंद सपकाळे हे आपल्या काही कार्यकर्त्यांसह कारने रिंग रोड परिसरातून जात होते. यावेळी दुचाकीवर आलेल्या काही तरुणांनी त्यांची गाडी अडवली आणि काही कळण्याच्या आतच वाहनावर दगडांचा वर्षाव सुरू केला. हल्लेखोरांनी इतक्या जोराने दगडफेक केली की कारच्या काचा फुटून सपकाळे यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली. हल्ल्यानंतर सपकाळे यांनी स्वतः जिल्हा पेठ पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हा हल्ला बॅनर छपाईच्या वादातून झाला असल्याचे समोर येत आहे. मुकुंद सपकाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल अहिरे नावाच्या तरुणासोबत त्यांचा वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून विशालने आपल्या साथीदारांसह हा हल्ला केल्याचा आरोप सपकाळे यांनी केला आहे.

भरदिवसा शहराच्या मुख्य भागात हा हल्ला झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

# महात्मा फुले यांचा स्त्रीशिक्षणाचा विचार आजही मार्गदर्शक; महापौर रवि लांडगे यांचे प्रतिपादन

## महापालिकेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा जो पाया घातला, तो भारतीय समाज परिवर्तनाच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा ठरला. त्या काळात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि महिलांना ज्ञानाच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा मार्ग दाखवला.

आज स्त्रिया शिक्षणाच्या बळावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती करत असून प्रशासन, शिक्षण, विज्ञान, उद्योग, क्रीडा तसेच सामाजिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. ही प्रगती महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या विचारप्रवाहाचेच फलित आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेस तसेच पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकातील त्यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये तसेच पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारकात झालेल्या अभिवादन कार्यक्रमास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिक्षण समिती सभापती रविना अंगोळकर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, कुशाग्र कदम यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता विनय ओहोळ, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले, क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचा त्याग, त्यांचे सामाजिक कार्य आणि समतेसाठी दिलेला लढा अतुलनीय असून भारतीय समाजाला दिशा देणारा आहे. त्यांनी शिक्षण, स्त्री-मुक्ती आणि सामाजिक न्यायाच्या माध्यमातून जे परिवर्तन घडवून आणले, ते आजही प्रेरणादायी आहे. अशा महापुरुषांचे विचार आणि साहित्य केवळ स्मरणदिनापुरते मर्यादित न राहता ते पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांमध्ये या विचारांची रुजवण होणे गरजेचे असून त्यासाठी शैक्षणिक स्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न होणे आवश्यक आहे. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वाचन उपक्रम तसेच विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या कार्याची आणि विचारांची ओळख करून दिल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर सकारात्मक परिणाम होईल.

आयुक्त विजय सूर्यवंशी यावेळी म्हणाले, क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक समतेच्या आणि शिक्षणाच्या कार्याला अभिवादन करताना, त्यांच्या विचारांचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या स्मारकाचे काम हे केवळ एक विकासकाम नसून, ते समाजप्रबोधनाचे आणि प्रेरणेचे केंद्र म्हणून उभे राहणार आहे. या स्मारकाचे काम प्राधान्याने व गतीने पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनाचे महापौर यांच्या हस्ते उद्घाटन**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'सामाजिक समता सप्ताह' व 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत पिंपरी येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध महत्त्वपूर्ण प्रसंगांचे दर्शन घडविणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन दि. ११ ते १५ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये दोन्ही महापुरुषांच्या कार्याचा, सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा आणि त्यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी क्षणांचा वेध घेणारी छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली असून, नागरिकांना त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा जवळून परिचय करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

# मराठवाडा-विदर्भात भूकंपाचे धक्के

**नांदेड । प्रतिनिधी**

सकाळी भूकंपाचे धक्के; हिंगोली, नांदेड, यवतमाळमध्ये हालचालराज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिमसह यवतमाळमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याची माहिती आहे. तर काही ठिकाणी भूकंपाची तीव्रता जास्त असल्याने घरांच्या भिंतींना तडे गेले असून घरावरील पत्रे हलल्याचीही घटना घडली आहे. अचानक सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीच वातावरण पसरलं असून अंदाजे ८ वाजून ४६ मिनिटांनी हा धक्का जाणवल्याची प्राथमिक माहिती आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये आज सकाळी आठ वाजून ४७ मिनिटांच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. हिंगोली जिल्ह्यांमध्ये दरवेळेस भूकंपाचे धक्के जाणवत असतात. मात्र यावेळेसचा भूकंपाचा धक्का हा मोठ्या प्रमाणात असल्याचं नागरिक सांगत आहेत. भूकंपाचा धक्का जाणवल्यानंतर अनेक गावातील घरामध्ये ठेवलेली भांडी आणि वस्तू जमिनीवर कोसळून पडले आहेत. तर अनेकांच्या घराला तडे गेल्याची सुद्धा प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा भूकंपाचा धक्का हिंगोली जिल्ह्यासह नांदेड, परभणी या जिल्ह्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात जाणवलेला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील संपूर्ण गावांना या भूकंपाच्या धक्के जाणवल्याची माहिती असून अद्याप पर्यंत कोणतीही जीवित हानी झाल्याची माहिती समोर आली नाही. मात्र भूकंपानंतर भयभीत झालेले नागरिक तत्काळ घराच्या बाहेर आले होते. तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असा आव्हान प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेला आहे. या भूकंपाचे अद्याप प्रशासन स्तरावर कोणतीही नोंद झाली नसली तरी प्रशासनाच्या वतीने या भूकंपाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला जातोय. भूकंपाचे केंद्रबिंदू पांगरा शिंदे गाव भूकंपाची नोंद झाली असून ४.७ रिश्टर स्केलचा हा भूकंप झाला आहे.

दुसरीकडे, नांदेडमध्ये देखील भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे. शहरातील सिडको, वजीराबाद, आनंद नगर, तरोडा सांगावी भागात हे धक्के प्रकर्षाने जाणवले आहेत. मिलेल्या माहितीनुसार, ४.७ रिस्टर स्केलचा हा भूकंप असल्याची माहिती आहे. वसमत येथील पांगरा शिंदे येथे १० किमी खोलीवर भुकंपाचे केंद्र असून भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात असल्याची माहिती आहे. तर तिकडे, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात शेबाळपिंपरी भागात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे. ८ वाजून ४५ मिनिटाने हा धक्का जाणवला आहे.

# साताऱ्यात थरारक घटना; सिग्नल छेडछाड करून ट्रेन थांबवली, प्रवासी लुटले

**कराड । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. सह्याद्री एक्सप्रेसवर दरोडा पडला आहे. रेल्वेच्या सिग्नलमध्ये बिघाड करून प्रवाशांना लुटले आहे.

मिरज लोहमार्ग पोलीसांकडून या घटनेचा तपास सुरु करण्यात आला आहे. कराड तालुक्यातील शेणोली स्टेशन परिसरातील घटनेने खळबळ उडाली आहे.



कोल्हापूरहून पुण्याला निघालेल्या सह्याद्री एक्सप्रेसवर कराड तालुक्यातील शेणोली स्टेशनजवळ दरोडा पडला आहे. सातारा व सांगली जिल्हा हद्दीपासून काही अंतरावर मध्यरात्री घटना घडली आहे.

सिग्नलशी संशयितांनी छेडछाड करत हा सिग्नल बंद पडला होता. सिग्नल बंद असल्याने रेल्वे थांबल्याचे पाहून संशयितांनी प्रवाशांचे सोने व मोबाईल लंपास केला आहे. घटनेनंतर माहिती समजताच मिरज लोहमार्ग रेल्वे पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# चुलत चुलत्याच्या अत्याचारानंतर मुलीचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या केज तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीवर तिच्याच चुलत चुलत्याने बळजबरी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली होती. अत्याचारानंतर पिडीतेने विष प्राशन करून आपलं जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. तिच्यावर गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र काल (शुक्रवारी, ता १०) तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या प्रकरणाने बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. तर आरोपीवर कठोर कारवाई व्हावी अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.



केजमध्ये ही घटना घडली होती. नात्याने चुलत चुलत्याने बळजबरी केली. अत्याचार केल्यांनतर अल्पवयीन मुलीने विष घेतल्याची घटना केज तालुक्यातील एका गावात समोर आली आहे. दरम्यान, अल्पवयीन मुलीला उपचारासाठी तिला छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यांनतर उपचार सुरू असताना शुक्रवारी तिचा मृत्यू झाला. केज तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलगी ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान गोठ्यातून घरी जात असतांना तिच्यावर चुलत चुलत्याने अत्याचार केल्याची घटना समोर आली होती. घटनेनंतर मुलीने विष घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. प्रकृती बिघडल्याने पीडितेला छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले.

# व्हॉट्सप कॉलवर 'मुंबई पोलीस'; निवृत्त व्यक्तीची कोट्यवधींची लूट

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याणमध्ये पुन्हा एकदा सायबर गुन्हेगारांनी धुमाकूळ घातला आहे. चक्क एका ६३ वर्षीय सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून त्यांना 'डिजिटल रेस्ट'ची भीती दाखवण्यात आली. तोतया पोलीस बनून आलेल्या भामट्यांनी या वृद्धाला चक्क २७ लाख ९० हजार रुपयांना गंडा घातला आहे. गेल्या सात दिवसांपासून हा मानसिक छळाचा आणि फसवणुकीचा खेळ सुरू होता. व्हॉट्सप कॉलवर 'मुंबई पोलीस' असल्याचे भासवून थेट 'दहशतवाद्यांशी' संबंध असल्याचे सांगत गंडा घातला . जाणून घेऊया सविस्तर.

कल्याण पश्चिमेकडील वाडेघर परिसरात राहणाऱ्या एका निवृत्त अधिकाऱ्याला सायबर भामट्यांनी आपल्या जाळ्यात ओढून लाखो रुपयांची लूट केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




ईस्माईल अब्बास सुरका (वय ६३, रा. रौनक सिटी) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.सात दिवसांपूर्वी सुरका यांना व्हॉट्सपवर एक कॉल आला. फोन करणाऱ्याने स्वतःची ओळख मुंबई पोलीस दलातील 'वरिष्ठ पोलीस निरीक्षक आकाश शर्मा' अशी करून दिली. तुमचे संबंध 'डॉ. शाईन फाईल' या दहशतवाद्याशी असून तुमच्या खात्यातून संशयास्पद व्यवहार झाले आहेत, अशी थाप मारून सुरका यांना घाबरवून सोडण्यात आले.

तोतया पोलीस अधिकारी व्हिडिओ कॉलवर पोलीस गणवेशात दिसत असल्याने सुरका यांचा त्यांच्यावर विश्वास बसला.तब्बल आठवडाभर चौकशीच्या नावाखाली सुरका यांना 'डिजिटल रेस्ट' म्हणजे एका जागी बसवून ठेवण्यात आले. या प्रकरणातून बाहेर पडायचे असेल तर आम्ही तुम्हाला मदत करू शकतो, असे सांगून आरोपी आकाश शर्मा आणि प्रेमा कुमार यांनी त्यांच्याकडून वेगवेगळ्या कारणांसाठी ऑनलाइन स्वरूपात २७ लाख ९० हजार रुपये उकळले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सुरका यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात धाव घेतली.

पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश पाटील या प्रकरणाचा तांत्रिक तपास करत आहेत. केवळ सुरकाच नव्हे, तर गेल्या काही दिवसांत कल्याण-डोंबिवलीत अशा अनेक घटना घडल्या आहेत.

# अंजनगाव पुतळा प्रकरणात कारवाई तीव्र; आणखी ६ जण अटकेत

**सोलापूर । प्रतिनिधी**

माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई केली आहे. अंजनगावला पुतळा पाठवणाऱ्या बाळराजे आवारेचा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कारखाना पोलिसांनी सील केला होता. तसेच या प्रकरणात आतापर्यंत आठ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. तर आता या प्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, अंजनगाव येथे जमिनीची मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना कामात अडथळा आणल्याप्रकरणी हि अटक करण्यात आली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील हाके यांचे सहकारी शिवम वाघमोडे, बाळू वाघमोडे, सतीश वाघमोडे, बंडू वाघमोडे, अरुण वाघमोडे, नितीन वाघमोडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी अटक केलेले सर्व आरोपी हे अंजनगाव येथील स्थानिक ग्रामस्थ आहेत, अशी देखील माहिती आहे.

दरम्यान, पोलिसांवर दगडफेक केल्याप्रकरणी या आधीच १२ आरोपीना पोलिसांनी अटक केली असून त्यातील १० जण अजूनही न्यायालयीन कोठडीत आहेत. मौजे अंजनगाव तालुका माढा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवल्याप्रकरणी दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी पासून गावामध्ये तणाव निर्माण झाला होता. गावातील दोन्ही समाज एकमेकांसमोर आंदोलनाकरिता बसले होते. अशावेळी प्रशासनाने जागेची मोजणी करून




घेण्याबाबत समन्वय्याने तोडगा काढला होता. परंतु मोजणी करताना मोजणी अधिकारी यांच्या कामात हस्तक्षेप करून कामात अडथळा आणल्या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे**

शिवम भारत वाघमोडे वय -२७ रा. अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर

बाळू नवनाथ वाघमोडे वय- ३१ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर.

सतीश हनुमंत वाघमोडे वय- २५ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर.

बंडू दिगंबर वाघमोडे वय - ३५ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर.

अरुण सुभाष वाघमोडे वय ३२ रा.अंजनगाव ता.माढा जिल.सोलापूर.

सोलापूर जिल्ह्यात विनापरवाना पुतळा उभारल्यास थेट एफआयआर (ऋखठ) दाखल करून ४ तासात पुतळा हटवणार, असा मोठा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. यासह विनापरवाना उभारण्यात आलेल्या पुतळ्याची माहिती लपवल्यास सात दिवसात पोलीस पाटलाचे निलंबन देखील होणार असल्याची माहिती आहे.

## संक्षिप्त

### शिक्षिकेच्या मृत्यूमागे धक्कादायक सत्य; पतीसह तिघे अटकेत



**बुलढाणा । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा येथील वृषाली गावंडे या जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका होत्या. दरम्यान २ मार्च २०२६ रोजी त्या जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथे आपल्या दुचाकीने कर्तव्यावर जात असताना एका चार चाकी मालवाहू वाहनाने त्यांना धडक देऊन अपघातात त्यांचं जागीच निधन झालं होतं. त्यानंतर पोलिसांनी तपास करत मृतक वृषाली गावंडे यांच्या पतीनेच एका चार चाकी वाहन चालकाला तीन लाख रुपये सुपारी देऊन वृषालीची अपघातातून हत्या करून घेतली या प्रकरणी पोलिसांनी वृषाली गावंडे यांचा पती, मित्र व वाहन चालक अशा तिघांना अटक केली आहे.

मात्र या गुन्ह्यात सामील असलेले वृषालीचे इतर नातेवाईक अद्यापही मोकाट आहे. पोलीस त्यांना अभय देत आहे का? असा सवाल करत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवावा व प्रख्यात वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करून हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवाव अशी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून मागणी केली आहे. खुद्द केंद्रीय मंत्र्यांनीच हे प्रकरण सीबीआय कडे सोपवण्याची मागणी केल्याने जिल्ह्यात बुलढाणा पोलिसांविरुद्ध रोष व्यक्त होत आहे.

कारस्थान रचत पतीने आपल्या शिक्षक असलेल्या पत्नीचा काटा काढल्याची धक्कादायक घटना बुलढाण्यात घडली आहे. अपघाताचा बनाव करत व सुपारी किलरला एक लाखाची सुपारी देत आपल्या पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा या गावात घडली आहे. २ मार्च रोजी वृषाली प्रकाश गावंडे या जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका असलेल्या पिंपळगाव काळे येथे ड्युटीवर जात असताना सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास त्यांच्या स्कुटीला अज्ञात वाहन चालकाने धडक दिली होती. यामध्ये वृषाली गावंडे यांचा जागेवरच मृत्यू झाला होता.

या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलीस आणि इतर लोक याठिकाणी पोहोचले तेव्हा वृषाली गावंडे यांच्या मृतदेहाशेजारी बसून त्यांचे पती प्रकाश गावंडे रडत बसले होते. त्यावेळी पोलिसांनाही हा अपघातच वाटला होता. मात्र, नंतर थोडी चौकशी केली असता वृषाली गावंडे यांच्या माहेरच्या कुटुंबीयांनी पोलिसांना घातपाताची शंका बोलून दाखवली होती. तेव्हा जळगाव जामोद पोलिसांनी या सगळ्याचे गांभीर्य ओळखून तात्काळ घातपाताच्या दृष्टीने या प्रकरणाचा तपास सुरु केला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि काही फोन कॉलचे रेकॉर्ड तपासले. या तपासाच्या आधारे पोलिसांनी वृषाली गावंडे यांच्या स्कुटीला धडक देणारा वाहनचालक मंगेश सूर्यवंशी याला ताब्यात घेतले.

मंगेश सूर्यवंशी याने पोलिसांनी केलेल्या चौकशीत वृषाली गावंडे या शिक्षिकेचा पती असलेला प्रकाश गावंडे व मध्यस्थी मंगेश चहुळकर (रा.पातुर्डा, तालुका संग्रामपूर) या दोघांनी आपल्याला एक लाख रुपये सुपारी देऊन वृषाली गावंडे यांचा अपघात घडवून आणल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी वृषाली गावंडे यांचा पती प्रकाश गावंडे व त्याचा मित्र मंगेश चहूळकर या दोघांनाही अटक केली. पोलिसांनी केलेल्या चौकशीनुसार पती प्रकाश गावंडे व त्याचा मित्र मंगेश जवळकर या दोघांनी टाटा पिकप चालक असलेला मंगेश सूर्यवंशी याला एक लाख रुपये देऊन स्वतःच्याच पत्नीचा अपघात घडवून आणण्यास सांगितले. २ मार्च रोजी सकाळच्या सुमारास शिक्षिका वृषाली गावंडे या शाळेवर आपल्या दुचाकीने जात असताना मंगेश सूर्यवंशी याने पातुर्डा ते कवठळ दरम्यान वृषालीच्या दुचाकीला धडक मारून तिला जागीच ठार केलं.

# कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त संदीप खरात यांच्या वतीने रुग्णांना फळवाटप; सामाजिक उपक्रमांची मालिका





**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १० शुक्रवार रोजी दुपारी ४ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असून, आज शुक्रवारी शासकीय सामान्य रुग्णालयात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना फळवाटप करण्यात आले. पँथर रिपब्लिकन पार्टीच्या वतीने संदीप खरात यांच्या पुढाकारातून हा उपक्रम पार पडला. मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या वाढदिवसाच्या उपक्रमांमध्ये हा समाजोपयोगी उपक्रम विशेष ठरला. यावेळी रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या प्रमाणात फळांचे वाटप करण्यात आले.

माध्यमांशी बोलताना कैलास गोरंट्याल यांनी संदीप खरात व त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले. दरम्यान, काही रुग्णांनी शासकीय रुग्णालयातील समस्यांबाबत त्यांच्याशी संवाद साधला. विशेषतः एमआरआय मशीनच्या अभावाबाबत त्यांनी मुद्दा उपस्थित केला. यावर गोरंट्याल यांनी लवकरच आरोग्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. तसेच, दोन-तीन दिवसांत मुख्यमंत्री यांची भेट होणार असून, त्या वेळीही घाटी रुग्णालयासाठी एमआरआय मशीनचा विषय मांडणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनीही गोरंट्याल यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन वाढदिवसानिमित्त सत्कार केला.

यावेळी रितेश चौधरी,राहुल खरात, आलोक सरोडेकर,अविनाश काकडे,सुभाष जाधव, गंगावणे दादा, वाघमारे दादा, भगवान पालवे, बापू निकम, गजेंद्र ठाकूर, सागर मेहका, विशाल रूपवते, संजय हिवराळे, राहुल मांगधरे, मनोज झिने,अतिश टायगर यांच्यासह आदींची उपस्थिती होती

## दरेगावात फुले-आंबेडकर संयुक्त जयंतीनिमित्त भव्य प्रबोधन कार्यक्रम उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दरेगाव येथे दि. १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता संविधान जागर अभियानाच्या वतीने भव्य प्रबोधन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ कामगार नेते कॉम्रेड अण्णा सावंत यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक लेखक प्रा. डॉ. बसवराज कोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कवी राजू खिल्लारे, मुख्याध्यापक शेळके सर, ड. देशमाने, ड. अनिल मिसाळ व सतिश वाहुळे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित पोस्टर प्रेझेंटेशन सादर करण्यात आले. तसेच प्रबोधनात्मक गाणी, चवदार तळे सत्याग्रहावर आधारित संगीतमय नाटिका, व्याख्याने आणि संविधान अभंगांच्या माध्यमातून उपस्थितांना सामाजिक व घटनात्मक जाणिवा जागृत करण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशाल वाहुळे यांनी केले. कार्यक्रमास गावातील महिला, पुरुष, विद्यार्थी व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कपील वाहुळे, राजू झिने, बाळू वाहुळे, आकाश वाहुळे, दिलीप मगरे, जयकुमार मगरे, दयासागर जाधव, विलास वाहुळे, सुरज झिने, भीमराव वाहुळे, संदीप वाहुळे, संजय वाहुळे, कांचन मगरे, भारताबाई वाहुळे, रवी आठवले आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालन्यात 'अमृतपेठ प्रदर्शन २०२६'चे उद्घाटन



**जालना । प्रतिनिधी**

आज महेश भवन येथे महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेद्वारे आयोजित अमृतपेठ प्रदर्शन २०२६ या प्रदर्शनाचे उद्घाटन माझ्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात विविध महिला बचत गटांनी सहभाग नोंदवत आपल्या कौशल्यपूर्ण कलाकृती, हस्तकला व स्थानिक उत्पादनांचे आकर्षक सादरीकरण केले. त्यांच्या या उपक्रमामुळे महिलांच्या स्वावलंबनाला चालना मिळत असून स्थानिक उद्योगांना नवी दिशा मिळत आहे.

या प्रदर्शनास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष श्री. सिद्धिविनायक मुळे, श्री. देविदास देशमुख, राज्य व्यवस्थापक श्री. दीपक जोशी, श्री. विजय राठी, श्री. उमेश बजाज, श्री. पवन बांगड, जिल्हा व्यवस्थापक श्री. नितीन खेकाळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

अमृत संस्था ही महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून महिला बचत गट, लघुउद्योजक आणि ग्रामीण भागातील उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. या संस्थेमार्फत महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सक्षमीकरण तसेच त्यांच्या उत्पादनांना योग्य व्यासपीठ देण्यावर भर दिला जातो. अशा उपक्रमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळून स्वावलंबी समाजनिर्मितीस हातभार लागतो. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील खाजगी कोचिंग क्लासमध्ये आठवीतल्या मुलावर लैंगिक अत्याचार झाल्याची संतापजनक घटना घडली आहे. कोचिंग क्लासच्या ऑफिस बॉयने स्टोअर रूममध्ये नेऊन या अल्पवयीन मुलाचा लैंगिक छळ केला असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात हा कोचिंग क्लास आहे. या घटनेप्रकरणी ऑफिस बॉयला पोलिसांनी अटक केली आहे.

विकास गायकवाड असं ३५ वर्षीय ऑफिस बॉयच नाव आहे. मुलाच्या प्रायव्हेट पार्टचे फोटोही ऑफिस बॉयने काढले असल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आठवीतला मुलगा मार्केट यार्ड परिसरात असलेल्या कोचिंग क्लासमध्ये शिक्षण घेत होता.

मागील दोन ते तीन वर्षापासून तो याच कोचिंग क्लासमध्ये रोज जायचा. याच दरम्यान ऑफिस बॉयने या आठवीत शिक्षण घेत असलेल्या मुलाला स्टोअर रूममध्ये घेऊन गेला. आणि त्याला अनैसर्गिक स्पर्श केला. मुलाच्या प्रायव्हेट पार्टचे ऑफिस बॉयने फोटो देखील काढले. मुलगा घरी जाऊन आई-वडिलांजवळ रडू लागला. क्लासला जायला नकार दिल्याने वडिलांनी शहानिशा केली असता मुलानेच हा सगळा प्रकार आई-वडिलांना सांगितला.

## अनैतिक संबंधासाठी मुलाचा बळी

**हिंगोली । प्रतिनिधी**

अनैतिक संबंधात अडथळा ठरत असल्याच्या कारणावरून स्वतःच्या मुलाच्या खुनाची सुपारी देऊन निर्घृण हत्या घडवून आणल्याची संतापजनक घटना हिंगोली जिल्ह्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणात मयत युवकाची आईच या कटाची मुख्य सूत्रधार असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले असून, महिलेसह दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे. सेनगाव तालुक्यातील जामदया शिवारात सापडलेल्या मृतदेहाचा पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत छडा लावत संपूर्ण कट उघड केला.

८ एप्रिल रोजी जामदया ते खिल्लार रस्त्यावर एका युवकाचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करून तपास सुरू केला. मृताची ओळख पटविण्यासाठी त्याचा फोटो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. त्यानंतर हा मृतदेह सचिन रामकिशन राजगुरू (रा. वढव, ता. लोणार, जि. बुलढाणा) याचा असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर अज्ञात आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासासाठी पोलिसांची विशेष पथके तयार करण्यात आली. अपर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान पोलिस लोणार तालुक्यातील वढव गावात पोहोचले असता रामदास विश्राम तनपुरे (वय ६५) याच्यावर संशय निर्माण झाला. त्याची सखोल चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली.

चौकशीत तनपुरे याचे सचिनच्या आई लीलाबाई हिच्याशी अनैतिक संबंध असल्याचे निष्पन्न झाले. या संबंधात सचिन अडथळा ठरत असल्याने लीलाबाईने त्याला संपवण्याचा कट रचला. तिच्या सांगण्यावरून तनपुरे याने नरेश साबण्या पवार याला २५ हजार रुपयांची सुपारी दिल्याचे उघड झाले. यानंतर आरोपींनी सचिनला पाहुण्यांकडे जायचे आहे असे सांगून आपल्या सोबत नेले. त्यानंतर त्याच्या डोक्यात दगड घालून हत्या केली.

## जनतेच्या मनातील आमदार आपणच असल्याचे सामाजिक उपक्रमातून दाखवून दिले

### मा.आ.कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केली भावना, अनेकांकडून शुभेच्छांचा वर्षाव शालेय साहित्यही दिले भेट

**जालना । प्रतिनिधी**

मागील सप्ताह भरापासून लोकोपयोगी सामाजिक उपक्रम उत्स्फूर्तपणे राबवून वाढदिवसानिमित्त भरभरून शुभेच्छा देत जनतेच्या मनातील आमदार आपणच असल्याचे दाखवून दिले अशी भावना जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी आज येथे बोलतांना व्यक्त केली.

आज गुरुवारी सकाळी माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी आपल्या वाढदिवसाची सुरुवात पत्नी नगरसेविका सौ.संगीताताई गोरंटयाल, नगरसेवक युवा नेते अक्षय गोरंटयाल यांच्यासह पाताल हनुमान मंदीरात दर्शन व आरती करून केली. त्यानंतर विविध कार्यक्रमांना हजेरी लावत शहरातील गुरू गणेश भवनमध्ये त्यांनी दुपारी वाढदिवसा निमित्त जालना शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यावसायिक, उद्योजक आणि हितचिंतकांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. त्यानंतर ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, यावर्षी आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर देण्याच्या सूचना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने जालना शहर व ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये रक्तदान शिबिर,आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, अन्नदान, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, गोशाळेत चारा वाटप अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमांमुळे सर्वसामान्य जनतेला मदत, त्यांची सेवा करण्याची संधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मिळाली आहे. मतदार संघातील जनतेचे भक्कम पाठबळ आणि आशीर्वाद असल्यामुळे काम करण्याची ऊर्जा मिळते.हा आशीर्वाद व पाठबळ भविष्यात देखील कायम राहील अशी अपेक्षा व्यक्त करून वाढदिवसा निमित्त भरगच्च सामाजिक उपक्रम राबवून भरभरून शुभेच्छा दिल्याबद्दल माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेचे आभार मानले.

दरम्यान, वाढदिवसा निमित्त राज्याच्या पशू संवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंढे, राज्याचे ओबीसी कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे,माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर नेत्यांनी भ्रमण ध्वनीवरून माजी आमदार कैलास गोरंटयाल यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या.

तर गुरू गणेश भवनमध्ये जालन्याच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, सभापती पूनम स्वामी, माया जोशी, अशोक पवार,भाजपा गटनेते महेश निक्कम, नगरसेवक महावीर ढक्का,रमेश गौरक्षक, अजय भरतीया, वीरेंद्र धोका, रोहित भुरेवाल, संतोष माधोवाले, सतीश जाधव, विनोद रत्नपारखे, विजय पांगारकर, जीवन सले, कार्तिका इंगळे, श्रीमती रिमा खरात, सौ. आढेकर, अंबडचे नगरसेवक केदार कुलकर्णी, उद्योजक केदार मुंदडा, कैलास लोया, नरेंद्र अग्रवाल, अशोक शर्मा, विनोद पाटणी, रमेश दाड, विजय कामड, सुदेश सकलेचा, कचरूलाल कुंकुलोळ, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आशिष देशमुख, गोवर्धन कोल्हे, सुदेश सकलेचा, ज्येष्ठ नेते फुलचंद भककड, रामेश्वर पाटील भांदरगे, अंकुशराव राऊत, ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, गोविंदप्रसाद मुंदडा, प्रा. रावसाहेब ढवळे, डॉ.सतीश मोरे, डॉ. आशिष राठोड, रामराव मगर, ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, दीपक भुरेवाल, शाह आलम खान, मसूद खान, बदर चाऊस, अतिक खान, विनोद यादव, संजय भगत, अशोक भगत, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, विजय सुराणा, मोहन इंगळे, राजेश खिवंसरा, प्रकाश काठेड, शितल तनपुरे, चंदाताई भांगडीया, मंगलताई खांडेभराड, मंदाताई पवार, मनोज जैस्वाल, डॉ.संजय रुईखेडकर, विधीज्ञ राहुल चव्हाण, शेख याकूब, प्रा.मदन, प्रा.रमेश शेळके, दिलीप मोरे, धनराज काबलीये, चंपालाल भगत, सुनील खरे, गोपाल चित्राल, रमेश पैठणे, नानासाहेब उगले, माजी जि.प.सदस्य संजय काळबांडे गजानन खरात, कंत्राटदार सुधाकर पवार, माजी नगरसेवक विजय पवार, आमेर पाशा, रामनगर सहकारी साखर कारखाना बचाव कृती समितीचे पदाधिकारी, कृष्णा पडूळ, राजू पोरवाल, ज्ञानेश्वर डुकरे, दीपक कावले, गोपाल मोरे, संदीप खरात, शिवा शेजूळ, अरुण सरदार, वैशाली सरदार, सुनील रत्नपारखे, धर्मा खिल्लारे, अभियंता सय्यद सऊद, इंजि.अनंता लोखंडे, सगीर अहेमद, राजेश ओ. राऊत, रहिमभाई तांबोळी, दत्ता घुले पाटील,दीपक कायंदे, मुरलीधर जाधव यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आदी क्षेत्रातील पदाधिकारी तसेच शहरी व ग्रामीण भागातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**